# शिक्षकांची भावनिक परिपक्वता व अध्यापन परिणामकारता यातील सहसंबंधाचा अभ्यास

प्रा. डॉ. अर्चना गणेश वातकर
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
रामदास पेठ, अकोला

*शोध अभ्यासाचा उद्देश हा शिक्षकांची भावनिक पक्वता व अध्यापन परिणामारता यांमधील सहसंबंध शोधने हा आहे. हे संशोधन अकोला विभागातील२०० शिक्षकांवर करण्यात आले. यासाठी संशाधिकेने डॉ.प्रमोदकुमार व डी.एन. मुथा यांची शिक्षक परिणामकारकता श्रेणी (Teacher Effectiveness Scale), डॉ.यशविर सिंग व डॉ महेश भार्गवा यांची भावनात्मक परिपक्पता श्रेणी (Emotional Maturity Scale) डॉ. एच. सि. शर्मा व डॉ आर. एल. भारद्वाज यांची भावनिक क्षमता चाचणी (The Scale of Emotional Competencies) या तीन प्रमाणित चाचण्यांचा वापर केला. अर्थनिर्वचनातून असा निष्कर्ष काढण्यात आला की, शिक्षकांची भावनिक परिपक्वता व अध्यापन परिणामकारकता यामध्ये अल्पसा परंतु निश्चित असा सहसंबंध आहे.*

**प्रस्तावना :—**

भावनांच्या अस्तित्वामुळे जीवनात एक प्रकारचे चैतन्य निर्माण होते. आपल्या सभोवतालच्या परिस्थितीशी मनुष्याचे व्यवस्थित समायोजन व्हावे यासाठी भावनांचा महत्त्वाचा सहयोग प्राप्त होतो. मात्र त्याचबरोबर भावनांची बुद्धिवर कुरघोडी होऊ दिली तर त्याच भावना विघातकपणे जीवनात कार्य करू षकतात. त्यामुळे भावना व्यक्तीच्या नियंत्रणात असणे आवश्यक असते. भावनांमुळे जीवन समृद्ध होते. साधारणपणे कुमार वयानंतर मूल जेव्हा तारूण्यावस्थेत पदार्पण करते तेव्हा त्याच्या भावनात्मक वर्तनामध्ये परिपक्वता येऊ लागते. व्यक्तीमध्ये जेव्हा सर्व प्रकारच्या धनात्मक आणि ऋणात्मक भावनांचा विकास होतो आणि प्रसंगाचे औचित्य ओळखून जेव्हा व्यक्ती त्यांचे उचित प्रकारे प्रकटीकरण करू लागते तेव्हा भावनात्मक दृष्ट्या ती व्यक्ती परिपक्व झालेली आहे असे म्हणता येऊ शकेल.

भावनात्मक परिपक्वतेसंबंधी जर्सिल्ड यांनी म्हटले आहे की, ‘‘भावनात्मक परिपक्वता म्हणजे भावनांचे केवळ दमण करणे किंवा त्यांचा पूर्ण प्रतिबंध करणे असा अर्थ नाही. भावनांचा पुरेपुर उपयोग करण्याची व्यक्तीची क्षमता लक्षात घेऊनच भावनात्मक परिपक्वतेचा अर्थ लावला गेला पाहिजे’’. समृद्ध जीवन जगण्याच्या दृष्टीने जो आपल्या भावनांवर यथायोग्य नियंत्रण ठेवू शकतो तोच मनुष्य भावनात्मक दृष्ट्या परिपक्व आहे असे म्हणता येईल. समाजामध्ये इतरांशी योग्य ते संबंध राखून त्यांच्यांशी प्रेमाने आणि सलोख्याने राहु शकणे हे भावनात्मक परिपक्वतेचे एक महत्त्वाचे लक्षण मानता येईल.

**शोध अभ्यासाची गरज व महत्त्व:**

शिक्षकांचे अध्यापन असे असावे की, ज्यातून विद्यार्थ्यांचे अध्ययन होऊ शकेल. अध्यापन परिणामकारक होण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भावनांचा स्विकार करण्यास शिकले पाहिजे. भावनांचे शिक्षण क्षेत्रातील महत्व ओळखून, त्या दृष्टीने शिक्षकांना विचार करायला लावण्यासाठी व स्वयं भावनिक परिपक्वता वाढीस लावण्यासाठी या संशोधन प्रकल्पाची गरज शिक्षकांना आहे. प्रस्तुत शोध अभ्यासाद्वारे शिक्षक व विद्यार्थी दोघांचाही व्यक्तिमत्व विकास होण्याच्या दृष्टीने निश्चितच फायदा होईल.

**संशोधन विधान:**

**‘‘शिक्षकांची भावनिक परिपक्वता व अध्यापन परिणामकारता यातील सहसंबंधाचा अभ्यास’’**

**संशोधन विधानातील संज्ञाच्या कार्यात्मक व्याख्या :—**

१. **शिक्षक** – शिक्षणातील प्राथमिक स्तर व माध्यमिक स्तरावर अध्यापन करणारे प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षक

२. **भावनात्मक परिपक्वता** – भावनात्मक परिपक्वता ही एक उर्जा असून त्यामध्ये शक्ति व गती असते. जेव्हा व्यक्तिला प्रोत्साहन मिळते किंवा कार्य करण्यासाठी प्रेरित केले जाते त्यावेळी मनामध्ये भावना निर्माण होतात. भावना निर्माण होण्याच्या या प्रक्रियेला समजणे व नकारात्मक तसेच असंतुलित करणाऱ्या भावनांना कमी करणे म्हणजेच भावनिक परिपक्वता होय
Emotional Maturity is defined as ,"A process in which the personality is continually striving for greater sense of emotional health, both intra –physically and intra-personally".
– Walter D. Smitson (1974)

**३. अध्यापन परिणामकारकता** –विद्यार्थ्यांचा व्यक्तिमव विकास करण्यासाठी अध्यापकाने शाळेतील वातावरणात केलेल्या सर्व बाबींचा मूल्यमापनात्मक अभ्यास करणे.
Effective teacher is one who quite consistently achieves goals – be they self-selected or imposed – that are related either directly or indirectly to student learning. Four major assumptions are implicit in this definition of teacher effectiveness – 1-Effective teachers tend to be aware of and actively pursue goals. 2-The teaching is an intentional and reasoned act. 3-The vast majority of teachers' goals are, or should be, concerned either directly or indirectly with their students' learning. And 4-No teacher is effective in every aspect of their profession".

**४. संबंधाचा अभ्यास** – दोन चलांमध्ये असलेला सकारात्मक, नकारात्मक किंवा शून्य सहसंबंध शोधणे.

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे :–**

१. शिक्षकांमधील भावनात्मक परिपक्वतेच्या क्षेत्रांचे मापन करणे.
२. शिक्षकांमधील भावनात्मक परिपक्वता व अध्यापन परिणामकारकता यातील संबंधाचा शोध घेणे.
३. शिक्षकांमध्ये सकारात्मक भावना विकसित करण्यास मदत करणे.
४. शिक्षकांमधील भावनात्मक परिपक्वतेच्या क्षेत्रांचे अध्यापनातील महत्त्व विषद करणे.
५. भावनात्मक परिपक्वतेची शैक्षणिक उपयोगिता सिद्ध करणे.
**६.** भावनात्मक परिपक्वतेचा आत्मविश्वासावर होणारा प्रभाव अभ्यासने.

**संशोधन अभ्यासाची गृहीतके (Assumption) :–**

१. भावनांचा विकास करता येतो.
२. शिक्षकांच्या भावनांचा त्यांच्या अध्यापनावर परिणाम होतो.
३. शिक्षकांच्या भावनांचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर परिणाम होतो.
४. शिक्षकांची अध्यापन कार्यक्षमता त्यांच्या भावनिक परिपक्वतेशी संबंधित असते

**संशोधन अभ्यासाची परिकल्पना (Hypothesis)–**

''शिक्षकांमधील भावनात्मक परिकल्पना व अध्ययन परिणामकारकता यामध्ये कोणताही संबंध नाही''

**संशोधनाची कार्यपद्धती**

या शोधनिबंधासाठी संशोधिकेने अकोला विभागातील १०० प्राथमिक स्तरावरील शिक्षक व १०० माध्यमिक स्तरावरील शिक्षक अशा २०० शिक्षकांच्या भावनिक परिपक्वता व अध्यापन परिणामकारतेच्या संबंधाचा अभ्यास केला. प्रस्तुत संशोधन अभ्यास हा सर्वेक्षणात्मक संशोधन अभ्यास असल्यामुळे माहिती संकलीत करण्यासाठी संशोधिकेने खालील प्रमाणित संशोधन साधनांची निश्चिती केली.

१. डॉ.प्रमोदकुमार व डी.एन. मुथा यांची शिक्षक परिणामकारकता श्रेणी (Teacher Effectiveness Scale)
२. डॉ.यशविर सिंग व डॉ महेश भार्गवा यांची भावनात्मक परिपक्पता श्रेणी (Emotional Maturity Scale)
३. डॉ.एच.सि. शर्मा व डॉ.आर. एल. भारद्वाज यांची भावनिक क्षमता चाचणी (The Scale of Emotional Competencies)

प्राथमिक व माध्यमिक शाळांतील २०० शिक्षकांकडून या चारही प्रमाणीत चाचण्या भरून घेण्यात आल्या. आलेल्या माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले.

**माहीतीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन:**

**तक्ता क्र.१: शिक्षकांमधील भावनात्मक परिपक्वतेच्या क्षेत्रांचे मापन करणे.**

| गुणांकन | परिपक्वता स्तर | शिक्षकांची सरासरी |
|---|---|---|
| ५०—८० | उच्च भावनिक परिपक्व | ६०.९८% |
| ८१—८८ | सर्वसामान्य भावनिक परिपक्व | १४.६३% |
| ८९—१०६ | भावनिक अपरिपक्व | ४.८८% |
| १०७—२४० | अति भावनिक अपरिपक्व | १९.५१% |
| | एकूण | **१००%** |

**अर्थनिर्वचन** :

१. ६०.९८% शिक्षक हे अति भावनिक परिपक्व आहेत.
२. १४.६३ % शिक्षक हे सर्वसामान्य भावनिक परिपक्व आहेत.
३. ४.८८% शिक्षक हे अति भावनिक अपरिपक्व आहेत.
४. १९.५१% शिक्षक हे अति भावनिक अपरिपक्व आहेत

**तक्ता क्र.२: शिक्षकांमधील अध्यापन सक्षमतेचा शोध घेणे.**

| टी— गुणांकनाची व्याप्ती | वर्गवारी | शिक्षकांची सरासरी |
|---|---|---|
| ७०च्या वर | उच्च अध्यापन सक्षम | ६.०६% |
| ६०.६९ | अध्यापन सक्षम | २१.२१% |
| ४०.५९ | सर्वसाधारण अध्यापन सक्षम | ६१.७०% |
| ३०.३९ | अध्यापन असक्षम | ३.०३% |
| २९ च्या वर | अत्यल्प अध्यापन सक्षम | ८.००% |
| | एकूण | १००% |

**अर्थनिर्वचन** :

१. ६.०६% शिक्षक हे उच्च अध्यापन सक्षम आहेत.
२. २१.२१% शिक्षक हे अध्यापन सक्षम आहेत.
३. ६१.७०% शिक्षक हे सर्वसाधारण अध्यापन क्षमतेचे आहेत.
४. ३.०३% शिक्षक हे अध्यापन असक्षमतेचे आहेत.
५. ८.००% शिक्षक हे अत्यल्प अध्यापन क्षमतेचे आहेत.

**तक्ता क्र.३ : शिक्षकांमधील भावनात्मक परिपक्वता चाचणी (EMS) व अध्यापन परिणामकारकता चाचणी (TES)यात मिळालेल्या गुणांतील सहसंबंध**

| शिक्षक स्तर | मध्यमान | | मध्यांक | | प्रमाण विचलन | | सहसंबंध गुणांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | EMS | TES | EMS | TES | EMS | TES | |
| प्राथमिक | ८०.५० | ३०७.४१ | ७४.०० | ३१२.५० | २३.६९ | ३२.५५ | —०.३२१ |
| माध्यमिक | ८४.०० | २८७.५७ | ८१.०० | ३०७.५० | २३.४३ | ७८.९७ | —०८३९४ |

**अर्थनिर्वचन** :

१. प्राथमिक स्तरावरील शिक्षांची भावनिक परिपक्वता व अध्यापन परिणामारकता यामध्ये ऋण सहसंबंध असून तो .३२ आहे. हा सहसंबंध अल्प असून निश्चित स्वरूपाचा आहे.
२. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची भावनिक परिपक्वता व अध्यापन परिणामारकता यामध्ये ऋण सहसंबंध असून तो .३९ आहे. हा सहसंबंध अल्प असून निश्चित स्वरूपाचा आहे.

**सर्वसामान्य निष्कर्ष** :—

१. शिक्षकांच्या भावनांचा त्याच्या अध्यापनावर परिणाम होतो.
२. शिक्षकांची अध्यापन कार्यक्षमता ही त्यांच्या भावनिक परिपक्वतेशी संबंधित आहे.
३. शिक्षकांच्या पणिमकारक अध्यापन कार्यक्षमतेचा विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेवर परिणाम होतो.
४. शिक्षकांमध्ये सकारात्मक भावनेचा अभाव दिसून येतो.
५. शिक्षकांचे वर्ग अध्यापनातील वर्तन हे अध्यापन क्षमता विकसित करण्यासाठी मदत करते.
६. शिक्षकांची भावनिक परिपक्वता शिक्षकांच्या व्यक्तिमत्व विकासावर अवलंबून असते.

**संशोधनाचे शैक्षणिक महत्त्व :—**

जीवन सातत्याच्या दृष्टीने भावनांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भोवतालच्या परिस्थितीशी मनुष्याचे व्यवस्थित समायोजन व्हावे यासाठी भावनांचा महत्त्वाचा सहयोग प्राप्त होतो. मात्र त्याचबरोबर भावनांची बुद्धिवर कुरघोडी होवू दिली तर त्याच भावना विघातकपणे जीवनात कार्य करू शकतात. यामुळे भावना व्यक्तीच्या नियंत्रणाखाली राहणे आवष्यक असते. भावनांमुळे जीवन समृद्ध होते तसेच परिस्थितीला यषस्वीपणे तोंड देण्यासाठी भावना मदत करतात.

भावना या भावातिरेकच्या मानसिक दशेच्या सूचक असतात, ज्या कुठल्याही उद्दिपक किंवा बाह्य उत्तेजनांमुळे निर्माण होतात. यामध्ये भाववेष आवेग व शारीरिक तसेच दैहिक क्रियांचा अंर्तभाव होतो. भावनांना उद्देजित करणाऱ्या परिस्थिती व्यक्तिची योग्यता, आवड व अभिरूची अनुसार बदलत असतात. विद्यार्थ्यांच्या वाढत्या वयानुसार स्पष्टपणे व्यक्त होणाऱ्या भावना कालांतराने गुंतागुत निर्माण करणाऱ्या ठरतात. त्यामुळे विद्यार्थ्याला आपल्या भावना स्पष्टपणे व्यक्त करता येत नाही व तो भावनांना लपवून ठेवायला शिकतो. विद्यार्थ्यांच्या वास्तविक व्यवहाराला ओळखण्यास यामुळे बाधा निर्माण होते. विद्यार्थ्यांच्या भावनात्मक व्यवहाराला समजण्यासाठी शिक्षकाने भावनांचे सूक्ष्म अध्ययन करावयाला शिकले पाहिजे.

**संदर्भ:**

१. http:www.facultyfocus.com/articles/teaching-professor-blog/defining-teaching-effectiveness
२. www.ijter.com
३. http:medin.nic.in/jakt06i1p66.pdf
४. पंडित र. वि.(२००९). शैक्षणिक मानसशास्त्र नागपूर: पिंपळापुरे ॲण्ड ' पब्लिशर्स